Social Axiom Foundation (SAF)


चिल्ड्रन अगेन्स्ट चाइल्ड अब्युझ

# प्रोजेक्ट काका (CACA)

## सपोर्ट–स्टाफ बुकलेट

बाल अत्याचाराविरूद्ध आपल्याला आणि आपल्या मुलाला सक्षम करण्यासाठी आणि मुलांना आनंदी, तंदुरुस्त आणि सुरक्षित ठेवण्यासाठी.



हे बुकलेट इंग्रजी, हिंदी आणि प्रादेशिक भाषांमध्ये www.projectcaca.org वरून डाउनलोड केले जाऊ शकते.

पार्टनर

CSJ | Fortis | edusynergies

विविध:
पाठिंब्यानेरू स्टेट लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज **(SLSA)** आणि स्टेट कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स **(SCPCR)** यांच्या पाठिंब्याने.

www.projectcaca.org

*RED-MRT-01*

# निर्देशांक


1. हे कम्पॅनियन बुकलेट कोणी वाचावे? 01
2. स्कूलची सेफ्टी पॉलिसी 01
3. काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्स 02
4. बाल हक्क 03
5. कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स ॲक्ट / बाल हक्क संरक्षण आयोग (CPCR) कायदा 03
6. जुवेलाइन जस्टिस (केयर अँड प्रोटेक्शन) एक्ट– JJ ॲक्ट / बाल न्याय कायदा (काळजी व संरक्षण) JJ कायदा 04
7. प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्सुअल ओफ्फेंसेस ॲक्ट – POCSO (पोक्सो) / लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा- (पोक्सो) **POCSO** 06
8. POCSO E&BOX (पोक्सो ई–बॉक्स) 09
9. नॅशनल सेक्स ऑफेंडर रजिस्ट्री –**NDSO** / राष्ट्रीय लैंगिक गुन्हेगार नोंदणी – **NDSO** 10
10. नॅशनल लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज – **NALSA** (नाल्सा) 11
11. काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्समध्ये समाविष्ट सरकारी लोगो / पॉलिसीज / योजना / हेल्पलाइन नंबर 12



द्वारे प्रकाशितः एड्युसिनर्जीस फॉर सोशल एक्सिओम फाऊंडेशन (SAF)

द्वारे छापलेलेः रेप्रो इंडिया लिमिटेड.


डिस्क्लेमर – हे बुकलेट पात्र तज्ञांच्या सल्ल्याला पर्याय म्हणून नाही. वाचकांच्या फायद्यासाठी विविध कायद्यांमधील मजकूर आणि तरतुदी सोप्या भाषेत देण्यात आल्या आहेत. हे बुकलेट कोणत्याही कायद्याचा पर्याय म्हणून नाही.


© कॉपीराइट 2021, SAF सोशल एक्सिओम फाऊंडेशन. सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

## 1. हे कम्पॅनियन बुकलेट कोणी वाचावे?

हे बुकलेट स्कूलच्या सेफ्टी पॉलिसी अंतर्गत मुलांना शिकविल्या जाणाऱ्या काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्सची पुरवणी आहे. वर्कबुक्स हा प्रोजेक्टचा मध्यवर्ती भाग आहे. याशिवाय, या प्रोजेक्टमध्ये स्कूलमधील शिक्षक,विद्यार्थ्यांचे आई–वडील आणि मदतनीस–स्टाफसाठी कम्पॅनियन बुकलेट्स आणि कार्यशाळा आहेत. सेफ्टी वर्कबुक्समध्ये आपल्या मुलांना त्यांचे हक्क (बाल हक्क), स्त्री–पुरुष समानता आणि बाल अत्याचार याबद्दलचे शिक्षण मिळते. हे वर्कबुक्स बाल अत्याचार रोखण्यावर लक्ष केंद्रित करते. वैयक्तिक सेफ्टी व्यतिरिक्त, त्यामध्ये आरोग्य आणि स्वच्छतेबद्दलची माहिती समाविष्ट आहे. मुले, शिक्षक, आई, आजी–आजोबा आणि सपोर्ट–स्टाफ वर्कबुकमध्ये विविध पात्रांमध्ये दिसतात. मुलांना त्यांच्या आई–वडीलांच्या मदतीशिवाय वर्कबुक्स समजू शकणार नाही. आई–वडील, शिक्षक आणि सपोर्ट–स्टाफसाठी बुकलेट इंग्रजी, हिंदी आणि विविध प्रादेशिक भाषांमध्ये आहेत ज्यामुळे सेफ्टी वर्कबुक्सनुसार स्वतःला त्याच्याशी जुळवून घेऊ शकतील.

> ही कम्पॅनियनची बुकलेट सपोर्ट–स्टाफसाठी आहे, ज्यापैकी काही आई–वडिल आणि आजी–आजोबांसाठी देखील आहेत. मात्र, मुलांची काळजी घेणाऱ्या कोणालाही ही बुकलेट वाचण्यात रस वाटेल. शेवटी, मुलांनी आनंदी, निरोगी आणि सुरक्षित राहावे अशी आपल्या सर्वांची इच्छा असते. स्कूलचा पूर्ण किंवा अर्धवेळ कंत्राटी सपोर्ट–स्टाफ जसे की– ड्रायव्हर्स, कंडक्टर, सफाई कामगार, मेड्स (मोलकरीण) इत्यादींना स्कूलमधील मुलांशी नियमितपणे संवाद साधावा लागतो. त्यांना मुलांच्या सेफ्टी संबंधित विविध कायदे समजून घेणे आवश्यक आहे.

## 2. स्कूलची सेफ्टी पॉलिसी

प्रोजेक्ट काका (CACA) कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स (बाल हक्क संरक्षण आयोग), सरकारी मंत्रालये आणि विभाग, स्कूल बोर्ड, सुप्रीम आणि हायकोर्ट इत्यादी विविध संस्थांनी जारी केलेल्या विविध सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे, नियम आणि परिपत्रकांचे अनुसरण करते, ज्याचे प्रत्येक स्कूलला पालन करावे लागेल. प्रत्येक स्कूलला आपल्या विद्यार्थ्यांसाठी खालील प्रकारच्या सेफ्टीची तयारी करावी लागेल.

### स्कूलसाठी चाइल्ड सेफ्टीची श्रेणी

1 पायाभूत सुविधा | 2. आरोग्य | 3. वाहतूक | 4. विद्यार्थी संरक्षण यंत्रणा | 5. वैयक्तिक, सामाजिक, भावनिक आणि सेक्युलर सेफ्टी (लैंगिक सुरक्षा) | 6. रिपोर्टिंग आणि प्रतिसाद यंत्रणा | 7. आपत्कालीन तयारी आणि आपत्ती व्यवस्थापन | 8. सायबर सेफ्टी

SAF Social Axiom Foundation

प्रोजेक्ट काका (CACA), मुलांना केंद्रस्थानी ठेवून वरील श्रेणींनुसार मुलांना, आई वडीलांना, आणि शिक्षक व सपोर्ट–स्टाफ यांना सक्षम, शिक्षित, आणि संवेदनशील बनवते. या प्रोजेक्टमध्ये बाल हक्क, स्त्री–पुरुष समानता आणि बाल अत्याचाराच्या शैक्षणिक, कायदेशीर आणि मानसिक पैलूंचा समावेश आहे.

## 3. काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्स

- 'कोमल' हा एक कार्टून प्रकारातला लघुपट आहे जो मुलांना बाल लैंगिक अत्याचाराविरूद्ध सक्षम करतो. **NGO -** चाइल्डलाइन इंडिया फाऊंडेशनने भारत सरकारच्या पाठिंब्याने याची निर्मिती केली आहे. कोमल इतर 7 वर्षांच्या मुलीसारखी आहे, दुर्दैवाने तिच्या शेजाऱ्याने तिच्यावर अत्याचार (वाईट वर्तन) केले आहे. हा चित्रपट मुलांना सेफ–अनसेफ (चांगल्या–वाईट) स्पर्शाबद्दल समजावून सांगतो जेणेकरून ते स्वतःचे संरक्षण करू शकतील. काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्स 'कोमल' चित्रपटावर आधारित आहेत. ते वयोमानानुसार आणि पुरोगामी मार्गाने चित्रपटात समाविष्ट असलेले विविध सेफ्टी तत्त्वे शिकवतात, जसे की:




सेफ – अनसेफ (चांगला–वाईट) स्पर्श
सिक्रेट्स
विश्वासू मोठी व्यक्ती
ही तुझी चूक नाही.
हट्टी असणे (आपल्या मतावर अडून राहणे)
सांगणे
चाईल्ड हेल्पलाईन नंबर 1098
खंबीर, इत्यादी

हा चित्रपट शाळेतील मुलांना दाखवला जात आहे. आईवडील, आजी–आजोबा, शाळेतील शिक्षक आणि सपोर्ट–स्टाफ यांनीही हा पाहिला पाहिजे. हा चित्रपट इंग्रजी, हिंदी आणि विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. 'कोमल चाइल्ड लाइन' लिहून आणि तमिळ, हिंदी इत्यादी आपली भाषा वापरुन यूट्यूब–इंटरनेटवर याचा सहज शोध घेता येतो.

वर्कबुक्स 3 जिवलग मित्रांभोवती फिरतात: एक मुलगी– सना एक मुलगा– अर्पित, आणि एक वाघ, पोक्सो. हे 3 वर्ग मित्र देखील आहेत.


पोक्सो


सना


अर्पित



सर्वेक्षण 2007 – मिनिस्ट्री ऑफ वीमन अँड चाइल्ड डेव्हलपमेंट (MW&CD) महिला आणि बाल विकास मंत्रालय (MW&CD), भारत सरकारः प्रत्येक दुसऱ्या मुलाला, मग तो मुलगा असो किंवा मुलगी त्यांना लैंगिक अत्याचाराच्या एक किंवा अधिक प्रकारांचा सामना करावा लागतो. लैंगिक अत्याचारामुळे मुलेही तितकीच असुरक्षित आहेत. बहुतेक प्रकरणांमध्ये, अत्याचार करणारा अनोळखी नाही तर मुलांच्या ओळखीचीच व्यक्ती असते.

## 4. बाल हक्क

18 वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीला मूल (बालक) म्हणतात. इतर सर्व व्यक्तींना प्रौढ म्हणतात. प्रौढांप्रमाणे मुलेही सिटीझन (देशाचे नागरिक) असतात. भारताच्या घटनेत जे काही हक्क नागरिकांना आहेत ते सर्व त्यांना आहेत. त्यांना विशेष अधिकार देखील आहेत जसे:

- ✓ मुलांना त्यांच्या हक्कांबद्दल जाणून घेण्याचा अधिकार आहे.
- ✓ मुलांना चांगले शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.
- ✓ मुलांना चांगले आरोग्य प्राप्त करण्याचा अधिकार आहे.
- ✓ मुलांना चांगले पोटभर जेवण मिळवण्याचा अधिकार आहे.
- ✓ मुलांना आर्थिक आणि लैंगिक शोषणापासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे. इत्यादी.

बालहक्कांवर आधारित अनेक कायदे आणि सरकारी योजना आहेत. सेफ्टी वर्कबुक्स आपल्या मुलांना त्याबद्दल माहिती देतात. लक्षात ठेवा, मुलांना त्यांचे हक्क मिळवून देणे ही प्रत्येक प्रौढ व्यक्तीची जबाबदारी आहे.

## 5. कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स कायदा

कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स कायदा (2005) राष्ट्रीय आयोग – NCPCR आणि स्टेट कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स SCPCR या कायद्यांतर्गत स्थापित केले जातात. बाल हक्क आणि संबंधित कायद्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी कमिशन्सवर (आयोगावर) आहे. अध्यक्ष प्रत्येक कमिशन्सचे प्रमुख असतात. बालहक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित बाबींवर प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करणे आणि योग्य ती कारवाई करण्यासाठी पोलिसांसारख्या योग्य अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून देणे अशी अनेक कार्ये या कमिशन्सची आहेत. कोणतीही तक्रार आली नसतानाही हे स्वतःहून (सुओ मोटो) चौकशी करू शकते.

## 6. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा – JJ कायदा / जुवेलाइन जस्टिस (केयर अँड प्रोटेक्शन) – JJ कायदा

हा कायदा संपूर्ण भारतात लागू आहे. या कायद्यानुसार 18 वर्षाखालील कोणत्याही मुलाला बालक (मूल) म्हणून परिभाषित केले जाते. हे A आणि B या दोन प्रकारात मोडणाऱ्या मुलांशी संबंधित आहे.

प्रवर्ग A : ज्या मुलांनी कायदा मोडला आहे (मुले कायद्याच्या विरोधात कृती करतात).

प्रवर्ग B : लहान मुलाप्रमाणे काळजी, संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसनाची गरज असलेल्या मुलांना:

बेघर किंवा निवारा नसलेला – अनाथ, बेवारस इत्यादी.

मानसिक किंवा शारीरिक दृष्ट्या अपंगत्व आहे आणि तिची किंवा त्याची योग्य काळजी घेण्यासारखे कोणीही नाही;

बालविवाह / लग्नाचे वय पूर्ण न होताच लग्न होत असलेला मुलगा/मुलगी, ज्यांच्या या परिस्थितीला त्यांचे आई–वडील किंवा घरातील इतर सदस्य जबाबदार आहेत.

इत्यादी.

> A श्रेणीतील मूल देखील B श्रेणीत येऊ शकते. उदाहरणार्थ, एक अनाथ जो कायद्याच्या विरोधात संघर्ष करीत आहे.

### चाइल्ड वेलफेयर कमेटी – CWC / बाल कल्याण समित्या – CWC

बाल कल्याण समित्या मुलांच्या काळजी, संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसनाची खात्री आणि व्यवस्था करतात. CWC मध्ये अध्यक्ष (चेअरपर्सन) आणि इतर चार सदस्य असतात. किमान एक सदस्य महिला असते आणि दुसरा सदस्य मुलांशी संबंधित बाबींवर तज्ज्ञ असतो.

✓ कोणीही मुलाला CWC (सीडब्ल्यूसी) समोर आणू शकतो, ज्यात मूल स्वत: देखील समाविष्ट आहे.

✓ मुलासह कोणीही चाइल्ड हेल्पलाइन 1098 ला कॉल करू शकतो.

### बालक न्याय मंडळ – JJB

✓ कायद्याशी संघर्ष करणाऱ्या मुलांना (यांना गुन्हेगार म्हणत नाही) बालक न्याय मंडळासमोर – JJB समोर हजर केले जाते, प्रौढांसाठी नेहमीच्या न्यायालयासमोर नाही. JJB मध्ये एक न्यायिक दंडाधिकारी आणि दोन सामाजिक कार्यकर्ते असतात, त्यापैकी किमान एक महिला असते. JJB कायद्याच्या विरोधात असलेल्या मुलासंदर्भात चौकशी (खटला नाही) करते आणि JJ कायद्यानुसार आदेश देते. लक्षात ठेवा, मुलाला कधीही पोलिस लॉक–अप किंवा तुरुंगात ठेवता येत नाही. जेव्हा JJB ला असे आढळते की कायद्याशी संघर्ष करणाऱ्या मुलाला देखील काळजी आणि संरक्षणाची गरज आहे, तेव्हा ते मुलाला CWC कडे पाठवू शकते. लक्षात ठेवा, JJB (जेजेबी) अशा मुलांकडे पण लक्ष पुरवते जे कायद्याच्या विरोधात जाऊन काही गुन्हे करतात जसे ज्यांनी चोरी, दरोडा, खून इत्यादी प्रकारचे गुन्हे केले आहेत.

### स्पेशल जुवेलाइन पोलिस युनिट / विशेष बालक पोलिस पथक - SJPU

मुलांचे खटले हाताळणारे पोलिस वेगळे असतात. त्यांना विशेष बालक पोलिस पथक (SJPU) म्हणतात. CWC, SJPU आणि JJB हे JJ कायद्यांतर्गत मुलांसाठी विशेष जिल्हानिहाय तयार केले जातात. शिवाय प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये मुलांशी व्यवहार करण्यासाठी एक विशेष पोलिस कल्याण अधिकारी असतो.

### JJB द्वारे आदेश

मुलांनी केलेल्या विविध प्रकारच्या गुन्ह्यांसाठी, मुलांना खालील प्रकारचे आदेश JJB देऊ शकते:

- सल्ला किंवा चेतावणी दिल्यानंतर घरी जाऊ देणे
- सामूहिक समुपदेशनात भाग घेण्यास सांगणे
- सामुदायिक सेवेमध्ये भाग घेण्यास सांगणे
- दंड भरणे
- आई वडीलांच्या देखरेखीखाली परिविक्षाधीन सोडण्यात येईल.
- सुधारणापर सेवा असलेल्या 'विशेष घरी' पाठवणे, परंतु तीन वर्षांहून अधिक काळ नाही.
- व्यसनमुक्ती केंद्रात पाठवणे.

* विशेष घर (स्पेशल होम) हे निवासी ठिकाण असते. विशेष घरात मूल स्कुल, व्यावसायिक प्रशिक्षण इत्यादी गोष्टींमध्ये भाग घेऊ शकते.

सरकारी सेवा, पासपोर्ट अर्ज इत्यादींमध्ये भविष्यात कोणत्याही अपात्रतेसाठी पोलिस कोणत्याही मुलाचा रेकॉर्ड ठेवू शकत नाहीत.

## बाल न्यायालय

जेव्हा 16 ते 18 वयोगटातील मुलाला खुनासारख्या घृणास्पद गुन्ह्यासाठी पकडले जाते आणि JJB समोर आणले जाते, तेव्हा JJB हे तपासते की मुलाची मानसिक क्षमता प्रौढ झाली आहे की नाही. जर JJB ला असे आढळले की मुलाची प्रौढ म्हणून मानसिक क्षमता आहे, तर ते मुलाला बाल न्यायालयात पाठवते. मुलाच्या मानसिक क्षमतेबाबत बाल न्यायालय JJB शी सहमत असू किंवा नसू शकते. जर बाल न्यायालयाने JJB शी सहमती दर्शविली, तर मुलाला प्रौढ मानले जाते आणि बाल न्यायालयात खटला भरला जातो. तथापि, कोणत्याही गुन्ह्यासाठी कोणत्याही मुलाला संपूर्ण जन्मठेपेची शिक्षा होऊ शकत नाही किंवा त्याला फाशीची शिक्षाही दिली जाऊ शकत नाही. जर बाल न्यायालय JJB शी सहमत नसेल, तर मुलाला प्रौढ म्हणून गणले जात नाही आणि बाल न्यायालयाने JJB द्वारे आदेशांमध्ये आधी नमूद केल्याप्रमाणे आदेश दिला गेला आहे.

## 7. लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा– POCSO (पोक्सो)

18 वर्षांखालील प्रत्येकाला लैंगिक गुन्ह्यांपासून वाचवण्यासाठी 2012 मध्ये हा कायदा तयार करण्यात आला होता. POCSO (पोक्सो) संपूर्ण भारतात लागू आहे. POCSO (पोक्सो) मध्ये परिभाषित केलेले गुन्हे जेंडर न्यूट्रल आहेत. कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि 2019 मध्ये ते अधिक कडक करण्यात आले आहेत.

### ठळक वैशिष्ट्ये:

- आरोपीला त्याचे / तिचे निर्दोषत्व सिद्ध करावे लागेल.
- बाल लैंगिक अत्याचाराची माहिती पोलिसांना दिली पाहिजे. रिपोर्ट न करणे हा गुन्हा आहे पोलिस अधिकाऱ्याने FIR (एफआयआर) नोंदविण्यास नकार देणे हादेखील गुन्हा आहे. रिपोर्ट न करण्यासाठी 0 ते 6 महिने आणि / किंवा दंडाची शिक्षा होऊ शकते.
- बालस्नेही आणि जलद गती असलेल्या जिल्हानिहाय विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. केवळ लैंगिक अत्याचार करणारे गुन्हे या न्यायालयांच्या कक्षेत येतात. विशेष न्यायालयांमध्ये इन–कॅमेरा ट्रायल चालतात. मुलाला कोणत्याही क्षणी आरोपीच्या संपर्कात आणले जात नाही.
- मुलाची सहमती वैध संरक्षण मानली जात नाही.
- पीडितांना नुकसान भरपाई दिली जाते.

### गुन्ह्यांची श्रेणी

POCSO (पोक्सो) कायद्यांतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे बाल लैंगिक अत्याचाराचे विविध गुन्हे तेव्हाच लागू होतात जेव्हा एखाद्या कृत्याच्या हेतूमध्ये लैंगिक स्वरूप असते. उदाहरण: बालवाडीतील विद्यार्थ्यांचे खराब झालेले कपडे बदलणारी मोलकरीण मुलाची इच्छा नसतानाही जर कपडे बदलत असेल तर या कृतीला पोक्सो कायद्यांतर्गत समाविष्ट केली जाणार नाही. 'हेतू' म्हणजे काय याची स्पष्ट व्याख्या नाही. न्यायालयासमोर खटल्याची वस्तुस्थिती आणि परिस्थिती लैंगिक हेतूची शक्यता किंवा अशक्यता दर्शवेल.

हा कायदा खालील सात श्रेणींमध्ये A ते G मध्ये विभागला जाऊ शकतो.

A . लैंगिक छळ (सेक्शुअल हरॅसमेंट)
B . लैंगिक अत्याचार (सेक्शुअल असौल्ट)
C . गंभीर लैंगिक आक्रमण (ॲग्रावेटेड सेक्शुअल असौल्ट)
D . भेदक लैंगिक आक्रमण (पेनिटेरेटिव्ह सेक्शुअल असौल्ट)
E . गंभीर भेदक लैंगिक आक्रमण (ॲग्रावेटेड पेनिटेरेटिव्ह सेक्शुअल असौल्ट)
F . अश्लील (पोर्नोग्राफिक) कारणांसाठी मुलांचा वापर
G . गुन्हा उद्युक्त करणे

A. लैंगिक छळः यात अशा गुन्ह्यांचा समावेश आहे ज्यामध्ये स्पर्श केला नसून अश्लील शेरेबाजी करणे, पाठलाग करणे, अश्लील चित्रे किंवा संदेश पाठवणे, प्रायव्हेट पार्ट्स (गुप्तांग) दाखवणे, इत्यादी, अशा गोष्टींचा समावेश आहे.

शिक्षाः 0 ते 3 वर्षे तुरुंगवास आणि / किंवा दंड.

B. लैंगिक अत्याचारः यात अशा गुन्ह्यांचा समावेश आहे जिथे स्पर्श केला जातो, परंतु स्पर्श (नॉन– पेनिटेरेटिव्ह) भेदक नसतो जसे की मुलाच्या प्रायव्हेट पार्ट्सना स्पर्श करणे किंवा मुलाला दुसऱ्या कोणाशी असेच करण्यास भाग पाडणे इत्यादी.

शिक्षाः 3 ते 5 वर्षांचा तुरुंगवास आणि दंडदेखील होऊ शकतो.

C. * गंभीर लैंगिक आक्रमण (E श्रेणी नंतरच्या बॉक्स मधील माहिती पहा)

D. भेदक लैंगिक आक्रमणः मुलाच्या शरीरामधील छिद्रामध्ये (तोंड आणि किंवा कंबरेच्या खाली कोणतेही छिद्र) कोणत्याही वस्तूचे / शरीराचे भाग घालणे.

शिक्षाः

a. 10 वर्षांचा तुरुंगवास ते आजीवन तुरुंगवास आणि दंड.
b. जर मूल 16 वर्षांपेक्षा लहान असेल, तर 20 वर्षांचा तुरुंगवास आणि दंड.

E. * ॲग्रावेटेड पेनिटेरेटिव्ह सेक्शुअल असौल्ट (गंभीर भेदक लैगिक आक्रमण): (खालील बॉक्समधील माहिती पहा)

*** गंभीर आक्रमण**

लैंगिक आणि भेदक लैंगिक आक्रमणांची व्याख्या अनुक्रमे गंभीर लैंगिक आक्रमण आणि गंभीर भेदक लैंगिक आक्रमण अशी केली गेली आहे. जेव्हा जबाबदार आणि विश्वास असलेल्या व्यक्तीने बाल लैंगिक अत्याचार केले तेव्हा त्याचे गांभीर्य वाढते, म्हणजे अधिक गंभीर होते. कुटुंबातील सदस्य, पोलिस कर्मचारी, सशस्त्र दलातील व्यक्ती, व्यवस्थापन किंवा शैक्षणिक संस्था/रुग्णालयाचे कर्मचारी, जबाबदारी आणि विश्वासाच्या पदावर असलेल्या व्यक्तींच्या श्रेणीत येतात. सामूहिक बलात्कार, मुलाचा मृत्यू घडवून आणल्यासारखे गुन्हे किंवा 12 वर्षांपेक्षा कमी वयाचा मुलाचा मृत्यू, हे आक्रमण एक गंभीर आक्रमण आहे.

शिक्षा:

गंभीर लैंगिक आक्रमण, 5 ते 7 वर्षे तुरुंगवास आणि दंड.

गंभीर भेदक लैंगिक आक्रमणासाठी, 20 वर्षांचा तुरुंगवास ते आजीवन तुरुंगवास आणि दंड किंवा फाशीची शिक्षा.

2019 मध्ये POCSO (पोक्सो) कायद्यात सुधारणा करण्यात आली. या दुरुस्तीत बाल पीडितांचे वयोमानानुसार वर्गीकरण, वाढीव शिक्षा, फाशीची शिक्षा वगैरे गोष्टी त्यात जोडल्या गेल्या आहेत.

F. अश्लील उद्देशांसाठी मुलांचा वापरः प्रिंटेड, इलेक्ट्रॉनिक, संगणक, टेलिव्हिजन चॅनेल, इंटरनेट किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन, प्रसारण, प्रकाशन, अश्लील सामग्रीची सुविधा आणि वितरण यासारख्या कोणत्याही माध्यमाद्वारे सामील करण्यासाठी मुलांना तयार करणे.

शिक्षा : 3 ते 5 वर्षे तुरुंगवास आणि दंड साठी जबाबदार असेल. असे गुन्हे पुन्हा करण्यासाठी, तुरुंगवास जास्त कालावधीसाठी असेल.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल इत्यादी कोणत्याही स्वरूपात बाल अश्लील मटेरियलची साठवण या कायद्यांतर्गत दंडनीय आहे. त्या व्यक्तीने गुन्ह्याची पुनरावृत्ती केली आहे की नाही, व्यावसायिक कारणांसाठी अश्लील साहित्य वापरण्याच्या उद्देशाने इत्यादी घटकांवर अवलंबून ही शिक्षा 0 ते 7 वर्षांची तुरुंगवास असू शकते.

G. उद्युक्त करणेः याचा अर्थ एखाद्याला गुन्हा करण्यास मदत करणे. POCSO (पोक्सो) कायद्याअंतर्गत उद्युक्त करणाऱ्याला गुन्हा करणाऱ्या व्यक्तीसारखीच शिक्षा सांगितली आहे.

### पुरावे आणि गुन्हेगारीची जागा सुरक्षित करणे

गुन्ह्याचा पुरावा सुरक्षित करणे आवश्यक आहे. ज्या भागात गैरवर्तन केले गेले आहे त्या भागाला वेढा देण्यासाठी आणि पोलिसांना सतर्क करण्यासाठी शाळेच्या अधिकाऱ्यांनी त्वरित पावले उचलली पाहिजेत. पुरावा नष्ट करणे हाच एक गुन्हा आहे.

### मुलाची ओळख गोपनीय ठेवणे

बालपीडित व्यक्तीच्या गोपनीयतेचे काटेकोरपणे संरक्षण केले पाहिजे. मुलाच्या ओळखीमध्ये त्याचे अथवा तिचे नाव, पत्ता, छायाचित्र, कौटुंबिक तपशील, शाळा, शेजारी इत्यादींचा समावेश असतो. शाळेच्या अधिकाऱ्यांनी मुलाची ओळख माध्यमांपासून संरक्षित आहे याची खात्री केली पाहिजे. विशेष न्यायालयाच्या (स्पेशल कोर्ट) परवानगीशिवाय मुलाची ओळख उघड करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला 6 महिने ते 1 वर्ष तुरुंगवासाची आणि / किंवा दंडाची शिक्षा होऊ शकते.

### **POCSO** (पोक्सो) अंतर्गत खोट्या तक्रारी

कोणतीही व्यक्ती, जी खोटी तक्रार करते किंवा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध खोटी माहिती पुरवते, ती 6 महिन्यांपर्यंतच्या आणि / किंवा दंडाच्या शिक्षेसाठी जबाबदार राहील. गुन्ह्याची नोंद न करू शकलेले बालक, जो खोटी तक्रार करतो किंवा गुन्ह्याबद्दल खोटी माहिती देतो, त्याला या कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाऊ शकत नाही.

## 8. POCSO (पोक्सो) ई–बॉक्स

NCPCR, MW&CD, भारत सरकारने POCSO (पोक्सो) ई–बॉक्स नावाचा एक निदर्शी ऑनलाईन तक्रार बॉक्स तयार केला आहे. हा ई–बॉक्स www.ncpcr.gov.in वर उपलब्ध आहे. मुलासह कोणीही बाल लैंगिक अत्याचाराची माहिती देण्यासाठी टोल–फ्री POCSO (पोक्सो) ई–बॉक्सचा मदत क्रमांक: 9868235077 किंवा 18001154555 किंवा चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक 1098 चा वापर करू शकतात.



SAF Social Axiom Foundation




पोक्सो ई–बॉक्स

**POCSO E-BOX**

## 9. नॅशनल सेक्स ऑफेंडर रजिस्ट्री / राष्ट्रीय लैंगिक गुन्हेगार नोंदणी – NDSO

लैंगिक गुन्हेगारांवरील राष्ट्रीय डेटाबेस हे भारतातील लैंगिक गुन्हेगारांचे राष्ट्रीय रजिस्टर आहे. यात 2005 पासून दोषी लैंगिक गुन्हेगारांची संपूर्ण माहिती आहे जेणेकरून त्यांचा मागोवा घेतला जाऊ शकेल आणि त्यांच्यावर लक्ष ठेवले जाऊ शकेल. 2018 मध्ये NDSO कार्यान्वित झाला आणि त्यामध्ये 4 लाखाहून अधिक दोषींचा तपशील आहे. हा डेटाबेस केवळ पोलिसांसारख्या कायदा अंमलबजावणी एजन्सींसाठी उपलब्ध असून जनतेसाठी उपलब्ध नाही. शाळांसह विविध संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पडताळणीसाठी पोलिस या डेटाचा वापर करतात.

## 10. नॅशनल लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज – NALSA (नाल्सा)

नॅशनल लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज NALSA (नाल्सा) राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण – NALSA

नॅशनल लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज (राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण) - NALSA (www.nalsa.gov.in) लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज कायदा, 1987 अंतर्गत स्थापन करण्यात आला आहे.

या कायद्यानुसार, मानवी तस्करी पीडित, POCSO (पोक्सो) पीडित, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे सदस्य, महिला, मुले, गरीब लोक इत्यादींना मोफत कायदेशीर सेवा पुरविल्या जातात. लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज POCSO (पोक्सो) पीडितांना नुकसान भरपाई देखील देतात.

भारताचे मुख्य न्यायमूर्ती NALSA चे प्रमुख आहेत. प्रत्येक राज्यात स्टेट लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज SLSA ची स्थापना झाली आहे. SLSA चे अध्यक्ष संबंधित हाय कोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती (चीफ जस्टिस) आहेत. प्रत्येक जिल्ह्यात डिस्ट्रिक्ट लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज – DLSA (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) ची स्थापना झाली आहे. हे जिल्हा न्यायालय (डिस्ट्रिक्ट कोर्ट) संकुलात स्थापित आहे आणि जिल्हा न्यायाधीशांच्या (डिस्ट्रिक्ट जज) अध्यक्षतेखाली आहे. तालुका विधी सेवा समित्याही तालुका स्तरावर स्थापन होतात. लीगल सर्विसेस ऑथॅरिटीज POCSO (पोक्सो) पीडितांना नुकसान भरपाई देखील करतात. ते वाद मिटवण्यासाठी वेळोवेळी लोक अदालतींचे आयोजन करतात.

## 11. काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्समध्ये समाविष्ट सरकारी लोगो / पॉलिसीज / योजना / हेल्पलाइन नंबर

**REPORT**

**Child labour** - https://pencil.gov.in/Complaints/add

**Child sexual abuse - CSA** - POCSO E - Box
https://ncpcr.gov.in/user_complaints.php **Or** call toll free POCSO Helplines 1800115455, 9868235077, Child Helplines 1098

**Food adulteration** - SMS/ WhatsApp at - 9868686868

**National Cyber Crime Reporting** - https://cybercrime.gov.in/

**TRACK**

A missing Child
https://trackthemissingchild.gov.in/trackchild/index.php

**ADOPT**

A Child - http://cara.nic.in/

**HELP-LINES**

**The National Disaster Response Force** (NDRF) - 9711077372

**Railway Police** - 1052

**Trangender certification by Ministry of Justice and Empowerment, Govt. of India** - http://transgender.dosje.gov.in/

**NIMHANS for psychosocial support and mental health services to survivors during disasters** - 080–46110007

**NALSA (Free Legal Aid)** - 15100

**National common emergency number** - 112

Drug de-addiction, Ministry of Social Justice and Empowerment Govt. of India 1800-11-0031

चिल्ड्रन अगेन्स्ट
चाइल्ड अब्युझ

# प्रोजेक्ट काका (CACA)

edusynergies

स्कूल सेफ्टी पॉलिसीं अंतर्गत
मुलांसाठी सेफ्टी प्रोग्राम.

काका (CACA) सेफ्टी वर्कबुक्स किंडरगार्टन
(बालवाडी ते इयत्ता 9 वी पर्यंत)

## वर्कबुक्स चे शीर्षके

- माय बिगिनर्स सेफ्टी वर्कबुक
- माय फर्स्ट सेफ्टी वर्कबुक
- माय सेकंड सेफ्टी वर्कबुक
- माय थर्ड सेफ्टी वर्कबुक
- माय फोर्थ् सेफ्टी वर्कबुक
- माय फिफ्थ सेफ्टी वर्कबुक
- माय सिक्स्थ सेफ्टी वर्कबुक
- माय सेवेन्थ सेफ्टी वर्कबुक
- माय एटत्थ सेफ्टी वर्कबुक
- माय नाइंथ सेफ्टी वर्कबुक

MRT

**Project CACA**
**Address:** EW - 3, Second Floor, Mianwali Nagar, Paschim Vihar, Delhi-110087
**Contact No:-** 011-40074904, 092054 88402, 092054 88405
**E mail:** info@projectcaca.org
**Website:** www.projectcaca.org
@projectcaca | @projectcaca

*End the Stigma, Raise Awareness*

*RED-MRT-01*